# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## निवडणूक सूचना

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ९९(क)(४)(ख) [99A(4)(b)] अन्वये विद्यापीठ विद्यार्थी परिषद सभापती आणि सचिव पदाची निवडणूक**

१) शैक्षणिक वर्ष २०१७ – १८ साठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ९९ (क) (४) (ख) [99A(4)(b)] नुसार विद्यापीठ विद्यार्थी परिषदेवर सभापती आणि सचिव निवडून देण्याकरिता दिनांक १७ मे, २०१७ रोजी महाराष्ट्र शासनाने राजपत्राद्वारे प्रसिध्द केलेल्या सन २०१७ चा एकरुप परिनियम क्रमांक ०१ मधील मुद्दा क्रमांक ०९ नुसार ही निवडणूक सूचना देण्यात येत आहे.

या संदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे.

99A(3) “ The University Students’ Council so formed shall elect its own President and Secretary”

२) **सदर निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील –**

| अ.क्र. | तपशील | तारीख, वार व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | उमेदवारी अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक, वार व वेळ (एकरुप परिनियम क्रमांक १(१०)(२)(ख) नूसार निवडणुकीच्या दिनांकाच्या पूर्ण १० दिवस अगोदर) | रविवार, दि. २१ जानेवारी, २०१८ (वेळ : सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | निवडणूक विभाग, मुख्य इमारती शेजारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |
| २ | उमेदवारी अर्जांच्या छाननीचा दिनांक, वार व वेळ | सोमवार, दि. २२ जानेवारी, २०१८ (वेळ : दुपारी १२.०० वाजता) | निवडणूक विभाग, मुख्य इमारती शेजारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |
| ३ | उमेदवारी अर्ज मागे घेण्यासंबंधी लेखी कळविण्याचा दिनांक, वार व वेळ (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(५) नुसार) | गुरुवार, दि. २५ जानेवारी, २०१८ (वेळ : सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | निवडणूक विभाग, मुख्य इमारती शेजारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |

| अ.क्र. | तपशील | तारीख, वार व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| ४ | निवडणूक दिनांक, वार व वेळ<br><br>(एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ९ नुसार) | गुरुवार, दि. ०१ फेब्रुवारी, २०१८ (वेळ : दुपारी ०३.०० ते ३.३० वाजेपर्यंत) | सेट अतिथी गृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |
| ५ | मतपत्रिकांची छाननी व मतमोजणीचा दिनांक, वार, वेळ व स्थळ | गुरुवार, ०१ फेब्रुवारी, २०१८ (मतदानाची वेळ संपल्यानंतर लगेचच) | सेट अतिथी गृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |

३) **उमेदवारी अर्ज /उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज भरण्यासंबंधीच्या सूचना :**

उमेदवारी अर्ज व उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावरील Downloads -> Download Nomination Form या लिंकवर उपलब्ध असून सदर अर्ज डाऊनलोड करुन घेता येईल. उमेदवारी अर्ज सादर करण्याच्या विहित वेळेपूर्वी विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावरील Nominations -> Pay Nomination fees या लिंकमार्फत उमेदवारी अर्जाचे शुल्क नापरतावा (Non - refundable) रु. १०००/- (रुपये एक हजार फक्त) व उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज सादर करण्याच्या विहित वेळेपूर्वी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचे नापरतावा (Non - refundable) शुल्क रु. २००/- (रुपये दोनशे फक्त) ऑनलाईन पध्दतीने भरता येईल किंवा सदर संबंधित अर्जाचे शुल्क "बँक ऑफ महाराष्ट्र" / "एच.डी.एफ.सी. बँक" या बँकेत चलनाद्वारे भरता येईल. अर्जासोबत संबंधित आवश्यक कागदपत्रे व चलनाद्वारे अथवा ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या शुल्काची पावती जोडून असे अर्ज निवडणूक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे विहित वेळेत जमा करावेत.

**टिप : ऐनवेळेला ऑनलाईन शुल्क भरताना तांत्रिक समस्या उद्भवल्यास किंवा चलनाद्वारे शुल्क भरताना बँकेच्या कामकाजाचे दिवस व वेळ पाळली न गेल्यास व त्यामुळे उमेदवाराला विहित वेळेत उमेदवारी अर्ज / उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज भरता न आल्यास त्याला विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.**

४) विद्यापीठ विद्यार्थी परिषद सदस्य मतदार यादीतील मतदारांनाच या निवडणुकीत भाग घेता येईल.

५) नामनिर्देशनपत्रांवर, मत देण्यासाठी हक्कदार असलेल्या दोन मतदारांकडून दिनांक लिहून स्वाक्षरी करण्यात येईल आणि त्यामध्ये, दिनांक, नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची पूर्ण नावे, पत्ते व पदनामे, कोणतीही असल्यास, आणि स्वाक्षरीकर्त्या मतदारांचा व नामनिर्देशित उमेदवारांचा मतदार क्रमांक यांचा समावेश असेल. कोणत्याही व्यक्तीला, त्याने नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी करुन व दिनांक लिहून त्याची संमती दिल्याखेरीज निवडणुकीतील उमेदवार म्हणून नामनिर्देशित केले जाणार नाही. कोणतीही व्यक्ती, त्याच्या स्वतःच्या नामनिर्देशनामध्ये एकतर सूचक किंवा अनुमोदक असणार नाही. परंतु, जेथे तीनपेक्षा कमी मतदार असतील तेथे उमेदवार, त्याच्या नामनिर्देशनामध्ये स्वतः सूचक व अनुमोदक असू शकेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(३)).

६) या निवडणूक सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व अटींचे अनुपालन करीत नसलेले नामनिर्देशनपत्र अवैध असेल आणि ते फेटाळले जाईल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(४))

७) योग्यरितीने भरलेले आणि विहित वेळेपूर्वी सर्व कागदपत्रांसह दाखल केलेले, उमेदवारी अर्जच विचारात घेतले जातील.

८) उमेदवारास निवडणुकीतून माघार घेण्याचा पर्याय खुला असेल : परंतु, अशा उमेदवारास निवडणुकीच्या वेळापत्रकात विहित केलेल्या दिनांकास सायंकाळी ५ वाजण्यापूर्वी विद्यापीठाच्या कार्यालयात व्यक्तिशः किंवा त्याने लिखित स्वरुपात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत त्याने स्वाक्षरीत केलेला नामनिर्देशन मागे घेतल्याचा अर्ज सादर करावा लागेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(५))

२/३

९) उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा उमेदवारांची अंतिम यादी विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१०) उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा अधिक उमेदवार नसतील तर ते सर्व उमेदवार, निवडणुकीचा निकाल जाहिर करण्याच्या दिनांकास बिनविरोध निवडून आल्याचे जाहिर करण्यात येईल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(८))

११) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २८ एप्रिल, २०१७ व त्या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचेच नामनिर्देशन अर्ज ग्राह्य धरण्यात येतील. शासन राजपत्र, शासनाने यासंबंधी वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे तसेच पात्रता शर्तीच्या ग्राह्यतेसंबंधीच्या नियमांबाबतच्या विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १८१/२०१७, दि. १८ ऑगस्ट, २०१७ यांची प्रत विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर Act/Statutes व Notifications/Circulars या लिंकवर उपलब्ध आहे.

१२) ही निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधित्व पध्दतीनुसार एकक संक्रमणीय मतानुसार परिनियमांव्दारे विहित केल्याप्रमाणे घेण्यात येईल. या निवडणुकीसाठी मतदान हे पसंतीनुसार प्राधान्यक्रम या पध्दतीने करावयाचे आहे. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ५ व ६)

१३) मतदानास येताना मतदारांनी स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र उदा. शैक्षणिक वर्ष २०१७ – १८ साठी संलग्न महाविद्यालये / मान्यता प्राप्त परिसंस्था / विद्यापीठ विभागाने निर्गमित केलेले वैध फोटोसहित ओळखपत्र, आधारकार्ड, पारपत्र, वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स) किंवा सर्वसाधारण निवडणुकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले फोटोसहित ओळखपत्र किंवा आयकर अधिका-यांनी (Income Tax) दिलेले फोटोसहित ओळखपत्र (PAN Card) किंवा तत्सम फोटोसहित ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. **मतदान केंद्रावरील निवडणूक अधिका-यांना हे ओळखपत्र दाखविल्याशिवाय मतदारांना मतपत्रिका मिळणार नाही.**

१४) उमेदवारी अर्ज छाननी आणि मतमोजणीच्यावेळी स्वतः उमेदवार किंवा त्याने लेखी पत्राव्दारे प्राधिकृत केलेला त्याच मतदार यादीतील मतदार असलेली व्यक्ती प्रतिनिधी म्हणून एक तास अगोदर पूर्वसूचना देऊन ओळखपत्र दाखवून हजर राहू शकेल.

१५) मतदानाची वेळ संपल्यानंतर लगेचच मतमोजणी होऊन निवडणुकीचा निकाल जाहिर करण्यात येईल.

मा. कुलगुरु यांच्या आदेशावरुन

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ क्र. सांफुपुविनि/९९(क)(४)(ख) / ४०५ )
दिनांक : ११ जानेवारी, २०१८ )

11.1.18
( डॉ. अरविंद दिगंबर शाळिग्राम )
**प्रभारी कुलसचिव**

**प्रत : सर्व संबंधित मतदार.**

**प्रत माहितीस्तव –**

(१) वित्त व लेखा अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ
(२) संचालक, विद्यार्थी विकास मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
(३) सहायक कुलसचिव, मा. कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
(४) सहायक कुलसचिव, मा. प्र. कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

**Savitribai Phule Pune University**
**( Formerly University of Pune )**

Electoral Roll for elections of University Students' Council
under section 99 A (4) (b) of the Maharashtra Public Universities Act, 2016

| Voter No. | Name and Address of the Voter |
|---|---|
| 1 | **Bhalerao Sunil Valiba** Satyaniketan Sanstha Adv.Manoharrao Nanasaheb Deshmukh Arts Science and Commerce College Addr: Rajur Tal: Akole Dist: Ahmednagar |
| 2 | **Bhatate Swapna Bhoru** "Maratha Vidya Prasarak Samaj K.P.G. Arts, Commerce & Science College, Igatpuri Addr: Near Take-Ghoti, |
| 3 | **Bhise Tanvi Prasad** Maharshi Karve Stree Shikshan Sanstha's Shri Sidhvinayak Mahila Mahavidyalaya Karvenagar, Pune Addr: Karvenagar Pune |
| 4 | **Dange Prajakta Sambhaji** Shirdi Sai Rural Institute Arts Science and Commerce College Addr: At Pimplas Rahata Ta:Rahta Dist:Ahmednagar Pincode:423107 Tal: Rahta Dist: Ahmednagar |
| 5 | **Daruwalla Freny Coover** Sadhu Vaswani Mission St.Mira's College for Girls Addr: 6, Koregaon Road Tal: Haweli |
| 6 | **Ghule Akshaya Ramesh** Sahyadri Bahujan Vidya Prasarak Samaj Sahkar Maharshi Bhausaheb Santuji Thorat Arts, Science and Commerce College Addr: Nashik road Near Nagarpalika Watter Tank Sangamner 422605 Dist: Ahmednagar |
| 7 | **Jadhav Dipali Sanjay** Pravara Gramin Shikshan Sanstha Arts Science and Commerce College,Kolhar Addr: Post-Kolhar Tal: Rahta Dist: Ahmednagar |
| 8 | **Jamble Shital Kalidas** Warvand Gram Shikshan Sanstha E.S. Divekar College Addr: Post-Warvand Tal: Dound Dist: Pune |
| 9 | **Kaygude Dipali Gorakh** Indian Institute for Social Development and Research, Rashtrapita Mahatma Gandhi College. At Post Khednagar, Tal. Karjat, Dist. Ahmednagar |
| 10 | **Kshatriya Madhura Rajesh** Shri Sairaj Shikshan Pratishtan Pune Vishwalata Arts, Science and Commerce college Addr: Bhatgaon Tal Yeola Dist Nasik 423401 Tal: Yeola Dist: Nashik |
| 11 | **Minj Praveen Fabianus** Krantijyoti Savitribai Phule Women's Studies Centre Savitribai Phule Pune University, Ganeshkhind Road, Pune |
| 12 | **Ojha Supriya Ravindra Prasad** "Kamala Education Society Pratibha College Of Education Addr: Block No D III,Plot No 3, Off Mumbai Pune Road, Behind Mehta Hospital, |
| 13 | **Parge Grace George** "Ashoka Education Foundation Ashoka College of Education Addr: servey no 1/8b/2 |
| 14 | **Rahane Ashwini Rajendra** Pravara Gramin Shikshan Sanstha Pravara rural College of education Addr: Post-Loni Tal: Rahta Dist: Ahmednagar |
| 15 | **Thakare Rohini Sahebrao** Pune Vidyarthi Gruh PVG Shriram Sadashiv Dhamankar College of Commerce and Science Addr: Dindori Road Behind Relinace Petrol Pump ,Near Mary Tal: Nashik Dist: Nashik |

Offg. Registrar
Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
Pune - 7.